# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 02/02/2021 (मंगळवार)

(सकाळ)

---

### घरफोडी

1) पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत 01 कि.मी अंतरावर मौजा वार्ड क्र. 3, नरखेड येथे दिनांक 24/01/2021 चे 23.00 वा. ते दिनांक 25/01/2021 चे 05.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– राहुल सुर्यभान कामडे, वय 24 वर्ष, रा. वार्ड क्र 3 नरखेड यांचे बंद घराचे कुलुप तोडुन अज्ञात आरोपीने घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने फिर्यादीच्या घरातुन लोखंडी कपाटात ठेवलेली 5 ग्राम ची पोत किमती 5,000/–रु. व सोन्या–चांदीचे दागिने कि 43,000/–रु. असा एकुण 48,000/–रु. चा मुद्देमाल चोरुन नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा मनोज गाढवे 8805405107 हे करीत आहे.

2) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 0.5 कि.मी अंतरावर मौजा सावनेर मनपसंत सेल येथे दिनांक 31/01/2021 चे रात्री दरम्यान फिर्यादी नामे– पंचशिल रामकृष्ण घोडेस्वार, वय 36 वर्ष रा. कोराडी रोड, मार्डन स्कुल चौक, दुर्गा माता नगर, नागपूर यांचे मनपसंद सेल दुकानाचे अज्ञात आरोपीने कुलुप तोडुन दुकानाचे आत प्रवेश केले. यानंतर आरोपीने दुकानाच्या कॉउन्टर मध्ये ठेवलेले नगदी 39,000/–रु. चा मुद्देमाल चोरुन नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा नारायण बोरकर 9823581297 हे करीत आहे.

### दुखापत

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 12 कि. मी अंतरावर मौजा कोहळी येथे दरम्यान फिर्यादी नामे– सौ. सुनिता कैलाश उईके, वय 43 वर्ष, रा. कोहळी वार्ड क्र. 02 ता. कळमेश्वर व आरोपी क्र 1) रेखा ओंमकार त्रिपात्रे हे आजुबाजुला राहत असून यांच्यात झालेल्या जुन्या भांडणाच्या कारणावरून भांडण झाले. दि. 29/01/2021 चे 08.30 वा. सकाळी "फिर्यादी हि घरासमोर पाणी का टाकते" या कारणावरून आरोपी क्र 1 हीने फिर्यादीचे हात पकडुन डोक्याचे केस पकडुन ढकलढुकल करून खाली पाडले. त्यामुळे फिर्यादीच्या पाठीला व उजवे हाताचे बोटाला फॅक्चर झाल्याने तेवढयात आ.क्र 2) मोना ओमकार त्रिपात्रे ही तिथे आली व तीने सुध्दा फिर्यादी सोबत शिवीगाळ केली व मारण्याची धमकी दिली. दोन्ही आरोपीपासुन फिर्यादीला भिती निर्माण झाली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीतांविरुध्द कलम 326, 504, 506, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक तभाने 8600458678 हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर